बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बँक

Corporate Communications & Investor Relations

Head Office: LOKMANGAL, SHIVAJINAGAR, PUNE-5

TELE -020 :25614495, 25614366, 25514501 to 12 Extn. 495

# वृत्तपत्रीय निवेदन

## बँक ऑफ महाराष्ट्रचा ८७ वा वर्धापनदिन साजरा - फिट इंडिया, फ्रीडम रन मोहिम २.० मध्ये सहभाग,तसेच अनेक सामाजिक उपक्रमांना साहाय्य

पुणे दिनांक १६ सप्टेंबर २०२१ : देशाच्या सार्वजनिक बँकिंग क्षेत्रातील एक अग्रगण्य बँक व पुण्यात मुख्यालय असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्रने आज दिनांक १६ सप्टेंबर २०२१ रोजी आपला ८७ वा वर्धापनदिन पुणे येथील मुख्यालयात दृकश्राव्य माध्यमातून साजरा करण्यात आला व विविध स्तरांवर असलेल्या बँकेच्या कार्यालयांच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम आयोजित करण्यात आले होते. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व व्यवस्थापकीय संचालक श्री ए एस राजीव यांनी बँकेचे ग्राहक व भागधारकांना बँकेच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने हार्दिक शुभेच्छा दिल्या व त्यांनी बँकेला दिलेल्या भक्कम पाठबळासठी व सातत्याने दर्शविलेल्या विश्वासाबद्दल आभार मानले.बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व व्यवस्थापकीय संचालक श्री ए एस राजीव यांनी आपल्या संदेशाद्वारे बँकेच्या वर्धापनदिनाच्या निमित्ताने बँकेच्या सर्व अधिकारी व कर्मचारी वर्गाचे हार्दिक अभिनंदन केले व तंत्रज्ञानाने युक्त अशी आपली आधुनिक बँक असण्यावर जोर देत बँकेची प्रगती होण्यासाठी बँकेचे कर्मचारी व अधिकारी सातत्याने करीत असलेल्या प्रयत्नांचे व परिश्रमांचे कौतुक केले .

बँकेचे कार्यकारी संचालक श्री हेमंत टमटा यांनी सर्व कर्मचारी वर्ग, ग्राहक, भागधारक यांचे बँकेच्या वर्धापनदिनानिमित्त हार्दिक अभिनंदन केले व सगळ्यांनी मिळून पूर्ण क्षमतेने व समर्पित भावाने काम केल्यामुळेच बँकेने हा मैलाचा दगड गाठला असल्याचे नमूद केले. तसेच नाविन्यपूर्ण सेवा व योजनांच्या माध्यमातून व भविष्यत अधिक ग्राहक केन्द्री दृष्टीकोन ठेवून बँक प्रगतीची नवीन नवीन शिखरे पादाक्रांत करेल असा विश्वास याप्रसंगी व्यक्त केला. .

बँकेचे संचालक श्री ए बी विजय कुमार यांनी बँकेच्या सरव्यवस्थापाकांच्या उपस्थित बँकेच्या संस्थापकांना पुष्पांजली अर्पण करून पुणे येथील मुख्यालयात वर्धापनदिन कार्यक्रमाचे उद्घाटन केले. संपूर्ण देशभरात बँकेने आपले अस्तित्व निर्माण केले असून बँक घेत असलेल्या परिश्रमांचे त्यांनी कौतुक केले व बँक ऑफ महाराष्ट्र ही महराष्ट्र राज्याप्रमाणेच देशातील सर्वसामान्य माणसाची बँक व्हावी अशी अपेक्षा व्यक्त केली.

श्री विजय कुमार यांनी निगमीय उद्दिष्टे साध्य करण्यासाठी संस्थेत योग्य तो समन्वय ठेऊन संघभावनेने काम करण्यावर भर दिला. लवकरच तीन खर्व एवढी व्यवसायिक आकडेवारी गाठण्याचे बँकेचे उद्दिष्ट असून प्रामाणिकता, पारदर्शकता, पूर्तता, नैतिक बँकिंग व काम करताना आनंदी वातावरण अशा कळीच्या घटकांमुळेच हे शक्य होईल यावर श्री विजयकुमार यांनी भर दिला. .

कोरोना महासाथीत मृत्युमुखी पडलेल्या कोव्हीड योद्ध्यांना दोन मिनिटे मौन पाळून बँकेतर्फे श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

बँकेच्या ८७ व्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने श्री विजय कुमार यांच्या नेतृत्वाखाली तंदुरुस्त भारत दौड २ .० आयोजित करण्यात आली होती व त्यामध्ये बँकेचे अनेक कर्मचारी सहभागी झाले होते.

.

बँकेच्या ८७व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून पंतप्रधान स्वनिधी योजनेचे लाभार्थी असलेल्या ८७ फिरत्या विक्रेत्यांचा बँकेचे कार्यकारी संचालक श्री विजय कुमार यांचे हस्ते सत्कार करण्यात आला.

तसेच विशेष बालकांसाठी कार्यरत असलेल्या पुण्याच्या जवळील पिरंगुट स्थित संस्कार प्रतिष्ठान संस्थेस बँकेच्या कर्मचाऱ्यांनी स्वतःचे योगदान देऊन सहाय्य केले. तसेच श्री विजय कुमार यांच्या नेतृत्वाखाली पुणे येथील नवी पेठेतील डेव्हिड ससून निवारा वृद्धाश्रमाला सुद्धा साहाय्य करून आपले सामाजिक उत्तरदायित्व निभावण्याचा अल्प प्रयत्न केला. .

बँकेच्या विधी व वसुली विभागाचे सरव्यवस्थापक श्री पी आर खटावकर यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले तर निरीक्षण विभागाचे सरव्यवस्थापक श्री व्ही डी कोल्हटकर यांनी आभार प्रदर्शन केले .